# बाबा मुक्तानंदांच्या शिकवणी

## वर्ष २०१८मध्ये बाबा मुक्तानंदांच्या महासमाधीच्या सन्मानाप्रित्यर्थ

## एक शिकवण

### शिकवण #५ :

मी ध्यान मोठ्या उत्सुकतेने, निष्ठेने आणि प्रीतीने करीत असे, कुठल्यातरी भयाला वश होऊन नव्हे. कुणाला प्रसन्न करण्यासाठी किंवा कोणाकडून काही लाभ प्राप्त करण्यासाठी किंवा एखादी वासना, कामना किंवा विषय-वृत्तीच्या पूर्ततेसाठी मी ध्यान करीत नव्हतो. कोणताही शारीरिक किंवा मानसिक व्याधी दूर करण्यासाठीही मी ध्यान करीत नव्हतो किंवा काही चमत्कारिक सिद्धी प्राप्त करून ख्यातनाम होण्याचीही मला इच्छा नव्हती. ध्यान करण्यासाठी मला कोणाचा आग्रहसुद्धा नव्हता. मी यासाठीही ध्यान करीत नव्हतो की, धर्म म्हणतो--‘ध्यान करणे चांगले आहे’. मी तर केवळ भगवत्प्रेमासाठी, भगवती चितिशक्तीच्या आकर्षणाने मोहित होऊन, स्वस्वरूपाच्या अनुसंधानासाठी ध्यान करीत होतो.[१]

~ बाबा मुक्तानंद

---

[१]स्वामी मुक्तानंद, *चित्शक्ती विलास* [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३] पृ. १४३.

© २०१८ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.